सं.फौ.ख.क्र.२१५/२०२३
नि.क्र. ०७ **लगत**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :- शशिकांत ज्ञानू सुर्वे
**वय** :– ६१ वर्षे, **धंदा** :– खाजगी धंदा,
**राहणार** :– खंबाळे-भाळवणी, ता. खानापुर, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे - श्री. बी.डी. काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

०१. दिनांक १८/१०/२०२२ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी कुठेही बोलवले नव्हते. माझ्या समक्ष पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीती नाही.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/१०/२०२२ रोजी पोलिस कर्मचा-यांसोबत मी रामोशी वस्ती येथे गेलो होतो व त्याठिकाणी आरोपीच्या ताब्यातून १८० मिली देशी दारू संत्रा कंपनीच्या २७ बाटल्या जप्त केल्या व त्यापैकी एक बाटली सी.ए परिक्षणकरिता वेगळी काढली आणि त्यावर माझ्या सह्यांचे लेबल लावले. त्यानुसार जप्ती पंचनामा तयार केला व त्यावर मी वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे - श्री. डी. एल. पाटील विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

०३. उलटतपास नाकारला

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.25 13:59:13 +0530

दि. २५/०३/२०२६
ठिकाणः आटपाडी.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी